महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक: ४ जुलै, २०२१.

क्रमांक:१०२८३/क-१, या सचिवालयातील सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या एस-२३:६७७००-२०८७०० या वेतनस्तरातील **अवर सचिव (समिती)** या पदावर कक्ष अधिकारी संवर्गातील खालील अधिकाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ. क्र. | कक्ष अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती सि. स. तांबे, कक्ष अधिकारी |
| २. | श्री. अ.श. पाटील, कक्ष अधिकारी (प्रपत्र बढती- मा.मंत्री गृहनिर्माण यांचे विशेष कार्य अधिकारी) |
| ३. | श्री. आ. ने. जावळे, कक्ष अधिकारी |
| ४. | कु. पु. र. दळवी, कक्ष अधिकारी |
| ५. | श्री. घ. ज्ञा. देबडवार, कक्ष अधिकारी |

२. श्री. अ. श. पाटील, कक्ष अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२, अट क्र. १८ नुसार तात्पुरत्या स्वरुपात प्रपत्र बढती (पदोन्नती) देण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार प्रपत्र बढतीचा कालावधी हा आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा राहील. त्यानंतर श्री. पाटील यांनी या सचिवालयात हजर होणे आवश्यक राहील.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील

..२/-

तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत.

४. संबंधित अधिकाऱ्यांना अवर सचिव (समिती) पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी अवर सचिव (समिती) संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिकाऱ्यांला पदावनत करण्याच्या अधीन सदर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(ब) सदरची पदोन्नती अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात आली आहे.

(क) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

..३/-

**प्रतिलिपी :-**

१) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

३) मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

६) सर्व संबंधित कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) वैयक्तिक नस्ती.

१०) निवडनस्ती.

\\Misc101\d\E drive\2021\promotion\Class 1\Section Officer\order.doc